# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ९० / २०२५

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित अस्वायत्त महाविद्यालये / विद्यापीठ विभागातील (अव्यवसायिक) अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध अर्थसहाय्य योजना शैक्षणिक वर्ष २०२४–२५

१. "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"

२. "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना"

३. ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना''

४. ''महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजना''

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित स्वायत्त / अस्वायत्त महाविद्यालये / विद्यापीठ विभागातील (व्यवसायिक / अव्यवसायिक) अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध अर्थसहाय्य योजना शैक्षणिक वर्ष २०२४–२५

५. ''स्वामी विवेकानंद अर्थसहाय्य योजना (पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)''

६. ''छत्रपती शिवाजी महाराज अर्थसहाय्य योजना''

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठ विभागात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत उपरोक्त अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी / विद्यार्थिनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय / विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **<u>"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"</u>**

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थिनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यापीठाकडून सदर अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार विद्यापीठाशी संलग्न अस्वायत्त महाविद्यालयातील / विद्यापीठ विभाग अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त २००० विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त ५०० विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. ५०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

Rahul 14/11/2025

• **"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजना"**

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून ही अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार विद्यापीठाशी संलग्न अस्वायत्त महाविद्यालयातील अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेनुसार जास्तीत जास्त २००० व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त ५०० विद्यार्थ्यास गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. ५,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

• **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसहाय्य योजना"**

मागासवर्गीय घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत सदर अर्थसहाय्य योजना कार्यान्वित केलेली आहे. **सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून** पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित अस्वायत्त महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील. त्यापैकी ४८ टक्के मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा एकत्रित गुणवत्तेनुसार व उर्वरित ५२ टक्के विद्यार्थ्यांचा त्या त्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रमे अर्ज विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य योजना लागू राहील. (सोबत सविस्तर नियम व अटी)

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ६०० | १६००० | ३०० |

• **"महात्मा जोतीराव फुले अर्थसहाय्य योजना"**

गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठामार्फत सदर अर्थसहाय्य योजना सुरू करण्यात आलेली आहे. पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित अस्वायत्त महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य योजना लागू राहील. (सोबत सविस्तर नियम व अटी)

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या | अर्थसहाय्य रक्कम (रूपये) | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ६०० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ६०० | १६००० | ३०० |

Ram 14/11/2015

- "<u>स्वामी विवेकानंद अर्थसहाय्य योजना</u> (पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)"

विद्यार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२०—२१ पासून नव्याने सदर योजना सुरू करण्यात आलेली आहे. **सदर योजनेचा लाभ विद्यापीठाशी संलग्न सर्व व्यावसायिक व अव्यावसायिक महाविद्यालयात** प्रवेशित सरसकट पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या एकूण ११,००० विद्यार्थ्यांस गुणवत्तेनुसार प्रत्येकी रू. २,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

- " **छत्रपती शिवाजी महाराज <u>अर्थसहाय्य</u> योजना**"

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त विद्यापीठ संलग्नित स्वायत्त/अस्वायत्त महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक/अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमांस अंतिम वर्षाच्या उन्हाळी सत्राच्या संबंधित अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेत सर्व विद्याशाखामधून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या (College/Institute Topper) फक्त एका विद्यार्थ्यास रू. ५०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.

**<u>अर्ज करण्याची पद्धत</u> :**

- वर उल्लेख केलेल्या अर्थसहाय्य योजनांकरीता विहित नियम व अटी विचारात घेऊन पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक असून आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत. **सोबत अर्ज करण्याची माहितीपुस्तिका जोडली आहे.**
- विहित केलेल्या नियमानुसार वरील पैकी १ ते ४ पैकी एकाच अर्थसहाय्य योजनेचा लाभ मिळणार असल्यामुळे एकापेक्षा जास्त अर्थसहाय्य योजनेसाठी अर्ज करावयाचा असल्यास एकाचवेळी अर्जातील योग्य ते पर्याय निवडता येतील.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील माहिती संबधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी काटेकोरपणे छाननी करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने विद्यापीठास विहित मुदतीत सादर करावी.

**<u>उपरोक्त अर्थसहाय्य योजनांसाठी अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक</u>:**

- वरील अर्थसहाय्य योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी **दि. <u>३१/०१/२०२५</u>** पर्यंत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावा.
- महाविद्यालय/विद्यापीठ विभागाने, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने भरलेल्या अर्जाची छाननी करून आपल्या महाविद्यालयाच्या **PUNCODE** वरून **दि. <u>०५/०२/२०२५</u>** पर्यंत Online पद्धतीने विद्यापीठास सादर करावी.
- **विद्यापीठ विभाग/महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे अर्ज (Hard Copy) स्वीकारले जाणार नाहीत.**

- महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज तपासून अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे सादर करण्याची प्रक्रिया करावी.
- बॅकांचे विलनीकरण झाल्यामुळे ज्या बॅकांची खाती नव्या बॅकेत विलीन झालेली आहेत अशा विद्यार्थ्यांची अर्थसहाय्याची रक्कम जमा करण्यास अडचणी येतात. सबब विद्यार्थ्यांनी या संदर्भात सध्या सुरू असलेले खाते (Existing Account) वा नव्याने असणारे खाते क्र.